# महापालिका स्थानक पूर्णत्वाकडे

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

महापालिकेच्या इमारतीखालील भूमिगत मेट्रोचे स्थानक पूर्णत्वाकडे जात आहे. मेट्रो ३ मधील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस स्थानकाची छायाचित्रे ही मेट्रो विकसित करणाऱ्या मुंबई मेट्रो रेल महामंडळाने (एमएमआरसी) ट्वीट केली आहेत.

मुंबईच्या पश्चिम उपनगरांना उत्तर-दक्षिण जोडण्यासाठी मेट्रो ३ ही मार्गिका उभी राहत आहे. या मार्गिकेचा पहिला टप्पा आरे ते बीकेसी डिसेंबर २०२३ तर धारावी ते कफ परेड, हा दुसरा टप्पा डिसेंबर २०२४ पर्यंत सुरू होणार आहे. या दुसऱ्या टप्प्यात सीएसएमटी या स्थानकाचा समावेश आहे. हे स्थानक महापालिका भवन इमारत व आझाद मैदानाच्या खालील भागात उभे करण्यात आले आहे. महापालिकेची इमारत ही वारसा यादीत असून तिला धक्का न लावता हे स्थानक तयार केले जात आहे. तसेच सध्याच्या सीएसएमटी स्थानकाच्या भुयारी पादचारी मार्गापर्यंत या स्थानकाचा विस्तार आहे. भुयारी मार्गात आझाद मैदान दिशेने जमिनीखाली स्थानक उभारणी सुरू आहे. हे स्थानक मेट्रो ३ व उपनगरीय रेल्वे यांना संलग्नता प्रदान करणार आहे.

